सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

गृहविभाग

**पोलीस अधीक्षक, कार्यालय,लोहमार्ग पुणे.**

सीआयडी ऑफीस कम्पाऊंड, शिवाजीनगर, संगम ब्रिज, पुणे-411005

दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२५५४१५३३
फॅक्स क्रमांक :- ०२०-२५५४१६३१
ईमेल :- sp.railways.pune@mahapolice.gov.in

पोअधी/लोह/स्टेनो/लोह.परि.क्रिडा/ /२०२२ पुणे दि.०५/०९/२०२२

**प्रति,**

**मा. पोलीस महासंचालक सो,**
लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय** :- लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धेच्या तयारी बाबतचा अहवाल...

**संदर्भ :-** दि.२३/०८/२०२२ रोजी आपल्या दालनात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने

******

**आदरणीय महोदया,**

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये सविनय सादर करण्यात येते की, खालील प्रमाणे दिनांक १९/०९/२०२२ ते दिनांक २४/०९/२०२२ या कालावधीत लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

**मुद्दा क्रमांक १ :- सदर लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धेचे नियोजन.**

सदर स्पर्धेमध्ये सर्वसाधारणपणे ४०० खेळाडू सहभाग घेणार आहेत. यासाठी आम्ही प्रत्यक्ष बालेवाडी क्रिडासंकुल, पुणे विदयापीठ, फर्ग्युसन महाविदयालय, भारती विदयापीठ, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ व गट क्रमांक २, महाराष्ट्र ज्ञान प्रबोधिनी पुणे याठिकाणी भेटी दिल्या असता सर्व खेळाडूंची एकत्रित राहण्याची सोय, एकत्र क्रिडा प्रकार, वाहतुकीचे नियोजन यासाठी राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ व गट क्रमांक २ व महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी पुणे यांची निवड करण्यात आली असुन सर्व पुरूष व महिला खेळाडूंची जेवण व खेळाची व्यवस्था त्याच ठिकाणी करण्यात आलेली आहे.

**मुद्दा क्रमांक २ :- पुरुष व महिला खेळाडूंची राहण्यांची व्यवस्था.**

सर्व पुरूष पोलीस खेळाडूंची राहण्याची व्यवस्था राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ व गट क्रमांक २ येथे करण्यात आलेली असुन महिला खेळाडूंची राहण्याची व्यवस्था महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी पुणे येथे करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे पोलीस निरीक्षक ते पोलीस उप अधीक्षक दर्जाचे अधिकाऱ्यांची राहण्याची व्यवस्था महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी पुणे या ठिकाणी प्रस्तावित आहे. सर्व खेळाडूंना येताना स्वत:चे बेडींगसह किट सरंजाम सोबत आणण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

**मुद्दा क्रमांक ३ :- जेवणाची व्यवस्था.**

नागपूर, पुणे, मुंबई येथील मुख्यालयातील तीन मेस साधन साम्रुगी व मनुष्यबळासह राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ या ठिकाणी कार्यान्वित करण्यात येणार असुन पुणे - ०२, औरंगाबाद - ०२, नागपूर - ०२, मुंबई - ०२ अशा ०८ खेळाडूंच्या कमिटी मार्फत किराणा व भाजीपाला कमिटी तयार करुन त्यांचेद्वारे रोजच्या खरेदीची प्रक्रिया पुर्ण करून रोज सकाळी नाष्टा, दुपारचे व सायंकाळच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**मुद्दा क्रमांक ४ :- खेळाचे प्रकार व त्या प्रमाणे मैदाने.**

एकुण सांघीक प्रकार - १.फुटबॉल, २.हॉकी, ३.हॅन्डबॉल, ४.बास्केट बॉल (पुरूष व महिला), ५.हॉलीबॉल (पुरूष व महिला), ६.कबड्डी (पुरूष व महिला), ७.खो-खो (पुरूष व महिला), ८.क्रॉस कंट्री (पुरूष व महिला)

एकुण वैयक्तिक खेळ प्रकार - १.ॲथलेक्टीस (१०० मी., २०० मी., ४०० मी., ८०० मी., १५०० मी., ५००० मी., १०००० मी., लांब उडी, तिहेरी उडी, उंच उडी, गोळा फेक, भाला फेक, थाळी फेक, १०० मी. हर्डल्स (महिला), ११० मी. हर्डल्स (पुरूष), ४०० मी. हर्डल्स (पुरूष व महिला), ४X १०० मी. रिले (पुरूष व महिला) ४X ४०० मी. रिले (पुरूष व महिला)) २. कुस्ती (पुरूष व महिला),

या खेळांकरीता आवश्यक मैदाने राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ व गट क्रमांक २ येथे सुव्यस्थित असुन दिनांक २०/०९/२०२२ ते दिनांक २४/०९/२०२२ या कालावधीत मैदानावर पाणी मारणे, लाईट व्यवस्था, ग्राउंड आखणी यासाठी सुव्यवस्थित टिम्स तयार करण्यात आलेल्या आहेत.

**मुद्दा क्रमांक ५ :- पंच.**

क्रिडा अधिकारी, पुणे यांचेशी स्वत: संपर्क साधुन प्रत्येक खेळाकरीता स्वतंत्र पंचाची नेमणुक करुन घेत आहोत.

**मुद्दा क्रमांक ६ :- स्पर्धेसाठीचा निधी.**

दिनांक २३/०८/२०२२ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांमध्ये स्पर्धेसाठीच्या निधीमध्ये पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई हे रक्कम रुपये ३,००,०००/- हे बरोबर नमुद केले असुन पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर यांनी रक्कम रुपये १,५०,०००/- व मागील बाकी रक्कम रुपये १,२५,०००/- असे एकुण रक्कम रुपये २,७५,०००/- देण्याचे कबुल केलेले आहे. तसेच लोहमार्ग औरंगाबाद येथील खेळाडूंच्या खर्चाबाबत पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर यांनी जबाबदारी घेतलेली आहे.

**मुद्दा क्रमांक ७ :- वाहन व्यवस्था.**

नागपूर येथील खेळाडूंनी कोणत्या प्रकारे नागपूर ते पुणे असा महामार्गाने प्रवास करावयाचा नसुन त्यांनी <u>सक्तीने रेल्वेनेच</u> प्रवास करावयाचे आवाहन करण्यात आलेले

असुन मुंबई लोहमार्ग मधील खेळाडू हे त्यांच्याकडील ०३ बसेस द्वारे मुंबई ते पुणे प्रवास करतील.

**मुद्दा क्रमांक ८ :- परिक्षेत्रीय संघांचा गणवेश.**

यासाठी ०४ प्रकारचे ट्रॅकसुटची निवड करण्यात आलेली असुन त्यातील योग्य त्या कमिटी मार्फत अंतिम रंगाची निवड केली जाईल.

**मुद्दा क्रमांक ९ :- विविध समित्या.**

परिशिष्ठ १ ते २० या प्रमाणे समित्या गठण करण्यात आलेल्या आहेत.त्या अनुक्रमे खालीलप्रमाणे.

आदरणीय महोदया लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा अत्यंत उत्साहात व योग्य नियमाप्रमाणे पार पाडण्याची दक्षता घेत आहोत.

**(सदानंद ग. वायसे-पाटील)भा.पो.से.**
पोलीस अधीक्षक,
लोहमार्ग पुणे.

सोबत - परिशिष्ट 1 ते 20 या प्रमाणेची माहिती

# परिशिष्ठ क्रमांक - १

## संयोजक समिती

| | | |
|---|---|---|
| संचालक | :– | मा. डॉ श्रीमती प्रज्ञा सरवदे पोलीस महासंचालक, लोहमार्ग महाराष्ट्र राज्य मुंबई. |
| अध्यक्ष | :– | मा. श्री. कैसर खलिद, पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई. |
| उपाध्यक्ष | :– | मा. सदानंद गं. वायसे–पाटील पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे. |
| उपाध्यक्ष | :– | मा. श्री. डॉ.संदीप भाजीभाकरे, पोलीस उपआयुक्त, लोहमार्ग मुंबई |
| सचिव | :– | मा. श्री. एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर. |
| सहसचिव | :– | मा. श्री. गणेश शिंदे, अपर पोलीस अधिक्षक, लोहमार्ग पुणे. |
| सदस्य | :– | श्री. प्रविण चौगुले, उप विभा. पोलीस अधिकारी लोहमार्ग सोलापूर |
| | :– | श्री. चंद्रकांत दत्तात्रय भोसले. पोलीस उपअधीक्षक,(मुख्या), लोहमार्ग पुणे. |
| | :– | श्री. दिपक काजवे, उपविभागीय पोलीस अधीकारी, लोहमार्ग, औरंगाबाद |
| | :– | श्री. मौला सय्यद, उप विभा. पोलीस अधिकारी -लोहमार्ग पुणे.–(अति कार्यभार) |
| | :– | श्री धनंजय इंगळे पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश लोहमार्ग पुणे |
| | :– | श्री सुरेशसिंग गौड पो. निरीक्षक, पोलीस कल्याण/ मसक लोहमार्ग पुणे. |
| | :– | श्री. इरफान शेख, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा लोहमार्ग पुणे. |
| | :– | श्री. मिलिंद झोडगे, सहा. पोलीस निरीक्षक, लोहमार्ग पुणे |
| | :– | श्री. विजय भोसले, राखीव पो. उपनिरीक्षक, लोहमार्ग पुणे. |
| | :– | श्री. मिलींद सावंत, पो.हवा, परिक्षेत्रीय स्पोर्ट इन्चार्ज , |
| | :– | श्री. प्रकाश सपकाळ, सपोफौ स्पोर्ट इन्चार्ज, लोहमार्ग पुणे. |
| | :– | श्री. विनोद चांगदेव कदम, पोहवा/७८६, लोहमार्ग मुंबई, स्पोर्ट इन्चार्ज |
| | :– | श्री. किशोर सरक, सपोफौ, लोहमार्ग नागपूर, स्पोर्ट इन्चार्ज |
| | :– | श्री. ऑजल थॉमस, सपोफौ, लोहमार्ग नागपूर, सहा.स्पोर्ट इन्चार्ज |
| | :– | श्री. रमाकांत कारले, पोहवा/११५२ सहा. स्पोर्ट इन्चार्ज, लोहमार्ग पुणे. |
| | :– | श्री इब्राहिम आरभावी पोहवा/७८० सहा. स्पोर्ट इन्चार्ज, लोहमार्ग पुणे. |

# परिशिष्ठ क्रमांक - २

## ज्युरी ऑफ अपिल

अध्यक्ष :– मा. डॉ. श्रीमती प्रज्ञा सरवदे पोलीस महासंचालक, लोहमार्ग महारा ट्र राज्य मुंबई.
सचिव :– मा. श्री. कैसर खलिद, पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई.
सहसचिव :– मा. सदानंद गं. वायसे–पाटील पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे.
सदस्य :– मा. श्री. एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर.
:– मा. श्री. गणेश शिंदे, अपर पोलीस अधिक्षक, लोहमार्ग पुणे.
:– श्री. चंद्रकांत दत्तात्रय भोसले. पोलीस उपअधीक्षक,(मुख्या), लोहमार्ग पुणे.
:– श्री. मनोज पगारे, पोलीस उप अधीक्षक लोहमार्ग औरंगाबाद.
:– श्री सुरेशसिंग गौड पो. निरीक्षक, पोलीस कल्याण/ मसक लोहमार्ग पुणे.
:– श्री. संजय सावंत राखीव पो. निरीक्षक, लोहमार्ग मुंबई.
:– श्री. दिलीप मेडेंम्वर, राखीव पोलीस निरीक्षक , लोहमार्ग नागपुर
:– श्री. विजय भोसले, राखीव पो. उपनिरीक्षक, लोहमार्ग पुणे.
:– श्री. प्रकाश सपकाळ, स्पोर्ट इन्चार्ज, लोहमार्ग पुणे.
:– श्री. विनोद चांगदेव कदम, पोहवा/७८६, लोहमार्ग मुंबई, स्पोर्ट इन्चार्ज
:– श्री. किशोर सरक, सपोफौ, लोहमार्ग नागपूर, स्पोर्ट इन्चार्ज
:– श्री. ऑजल थॉमस, सपोफौ, लोहमार्ग नागपूर, स्पोर्ट इन्चार्ज
:– श्री. रमाकांत कारले, पोहवा/११५२ सहा. स्पोर्ट इन्चार्ज, लोहमार्ग पुणे.
:– श्री इब्राहिम आरभावी पोहवा/७८० सहा. स्पोर्ट इन्चार्ज, लोहमार्ग पुणे.

कामे :– स्पर्धकांना खेळामध्ये देण्यात आलेल्या गुणांकानाबाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी ज्युरी ऑफ अपिल मधील सदस्यांकडे अपिल करावयाचे आहे.

# परिशिष्ठ क्रमांक - ३

## स्वागत समिती

अध्यक्ष :— मा. सदानंद गं. वायसे—पाटील पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे.
सदस्य :— मा. श्री. गणेश शिंदे, अपर पोलीस अधिक्षक, लोहमार्ग पुणे.
सभासद :— श्री. प्रविण चौगुले, उप विभा. पोलीस अधिकारी लोहमार्ग सोलापूर
:— श्री. चंद्रकांत दत्तात्रय भोसले. पोलीस उपअधीक्षक,(मुख्या), लोहमार्ग पुणे.
:— श्री. मौला सय्यद, उप विभा. पोलीस अधिकारी लोहमार्ग पुणे.—(अति कार्यभार)
:— श्री. इरफान शेख, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा लोहमार्ग पुणे.
:— श्रीमती अस्मिता पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा, लोहमार्ग पुणे
:— श्रीमती दिपाली मोरे, सहा. पोलीस निरीक्षक, पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे

कामे :— नेमलेले सर्व सभासद यांनी प्रमुख पाहुणे व इतर मान्यवर यांचे स्वागताकरिता चांगल्या प्रतीची बुके, कॅप व ब्लेझरवर लावायचे गेस्ट बॅचेस कार्यक्रम सुरू होण्याचे अर्ध्या तास अगोदर घेवून प्रमुख पाहुणे व मान्यवर यांचे स्वागत करून कॅप, बॅचेस लावावे.

# परिशिष्ठ क्रमांक - ४

## स्वागत व सांगता समारोह व बक्षिस वितरण समिती

अध्यक्ष :— मा. सदानंद गं. वायसे—पाटील पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे.
सचिव :— मा. श्री. गणेश शिंदे, अपर पोलीस अधिक्षक, लोहमार्ग पुणे.
उपसचिव :— श्री. प्रविण चौगुले, उप विभा. पोलीस अधिकारी लोहमार्ग सोलापूर.
:— श्री. चंद्रकांत दत्तात्रय भोसले. पोलीस उपअधीक्षक,(मुख्या), लोहमार्ग पुणे.
:— श्री. मौला सय्यद, उप विभा. पोलीस अधिकारी लोहमार्ग पुणे.—(अति कार्यभार)
:— श्री सुरेशसिंग गौड पो. निरीक्षक, पोलीस कल्याण/ मसक लोहमार्ग पुणे.
सदस्य :— पोहवा/७८९, दत्ताराम धोंडीराम पासगे, लोहमार्ग खडकी, पुणे

कामे :— समितीने ठरविलेले बक्षिस खरेदी करून भांडारपाल यांचे ताब्यात देवून ते व्यवस्थीत रॅप झाले की नाही यांची एक आठवडा अगोदर खात्री करून घ्यावी. वैयक्तीक बक्षिस त्याच ठिकाणी मैदानावर उपस्थित असलेल्या समितीमध्ये वरिष्ठ अधिकारी यांचे हस्ते बक्षिस दयावे. सांघिक खेळाचे सांगता समारंभाच्या दिवशी बक्षिस देण्यात येईल. प्रत्येक सांघिक खेळाचे बक्षिस व्यवस्थित रॅप करून खेळाचे नाव आहे किंवा नाही यांची खात्री करून घ्यावी.

# परिशिष्ठ क्रमांक - ५

## अल्पोपहार/बडाखाना समिती

अध्यक्ष :— मा. सदानंद गं. वायसे—पाटील पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे.
सदस्य :— श्री. प्रविण चौगुले, उप विभा. पोलीस अधिकारी लोहमार्ग सोलापूर.
:— श्री. चंद्रकांत दत्तात्रय भोसले. पोलीस उपअधीक्षक,(मुख्या), लोहमार्ग पुणे.
:— श्री. मौला सय्यद, उप विभा. पोलीस अधिकारी लोहमार्ग पुणे.—(अति कार्यभार)
:— श्री. प्रमोद खोपीकर, पो.निरीक्षक, पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे,
:— श्री. इरफान शेख, पो.निरीक्षक, स्था.गु.शा, लोहमार्ग पुणे
:— श्री. विजय भोसले, राखीव पो. उपनिरीक्षक, लोहमार्ग पुणे.
:— श्री. संजय तोडमल, सपोफौ मेस मॅनेजर, लोहमार्ग पोलीस मुख्यालय पुणे.

कामे :— बाहेरचे आमंत्रीत रेफरी उपस्थित अधिकारी यांना चहा पाण्याची व्यवस्था तसेच सांगता समारोहच्या दिवशी चहा अल्पोहार व्यवस्था नेमून दिलेले केटर्स किंवा मेस मधील कर्मचारी यांचेकडुन कार्यक्रम सुरू होण्याचे अगोदर करून घेणे. कार्यक्रमाचा मध्यांतर झाल्यावर सर्वांना चहा नाष्टा मिळाला पाहिजे याची काळजी घेणे. प्रमुख पाहुण्यांना चहा नाष्टयामध्ये कुठलीही कमी जाणवायला नको. याची पुर्ण काळजी कमिटीने घ्यावी. नेमून दिलेले कर्मचारी यांचेकडुन कामे करून घ्यावी. तसेच बडाखानाची व्यवस्था अतिशय चांगली करावी.

# परिशिष्ठ क्रमांक - ६

## निवास व वाहन समिती

| | |
|---|---|
| अध्यक्ष | :– श्री. चंद्रकांत दत्तात्रय भोसले. पोलीस उपअधीक्षक,(मुख्या), लोहमार्ग पुणे. |
| सचिव | :– श्री. मौला सय्यद, उप विभा. पोलीस अधिकारी लोहमार्ग पुणे.–(अति कार्यभार) |
| सदस्य | :– श्री धनंजय इंगळे पोलीस निरीक्षक बिंनतारी संदेश लोहमार्ग पुणे |
| | :– श्री सुरेशसिंग गौड पो. निरीक्षक, पोलीस कल्याण/ मसक लोहमार्ग पुणे. |
| | :– श्री. विजय भोसले, राखीव पो. उपनिरीक्षक, लोहमार्ग पुणे. |
| | :– श्री. हिरालाल बल्लाळ, पोहवा/६५१, लाईन अंमलदार, खडकी, लोहमार्ग पुणे |
| | :– श्री. राजु शिर्के, पोना/८६९, (लाईन अंमलदार खडकी), लोहमार्ग पुणे. |

कामे :– सदर समितीने दोन्ही जिल्हयाचे आलेले खेळाडू व संबंधीत टिम मधील अधिकारी यांची राहण्याची व्यवस्था ज्या ठिकाणी केलेली असेल त्याठिकाणी प्रत्यक्षात जावून खात्री करून घ्यावी. तेथे टॉयलेट, बाथरूम व पाण्याची सोय आहे किंवा नाही तसेच टॉयलेट, बाथरूम मध्ये लाईटची सोय आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. खेळाडु यांना ने–आण करणेकरिता त्यांचेकडे वाहन उपलब्ध नसल्यास आपले एम.टी मधुन एक–एक मोठे वाहन उपलब्ध करून देता येईल त्यापेक्षा दुसरे वाहन उपलब्ध नसल्याने देता येणार नाही. सदर समितीने काळजीपुर्वक लक्ष दयावे.

## परिशिष्ठ क्रमांक - ७

### प्रसिध्दी समिती

अध्यक्ष :— श्री. प्रमोद खोपीकर, पोलीस निरीक्षक, पुणे लोहमार्ग ठाणे.
सदस्य :— श्री. इरफान शेख, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा, लोहमार्ग पुणे.
:— श्री. संजय सपार, पोलीस उपनिरीक्षक, जिविशा, लोहमार्ग पुणे.
:— श्री. लक्ष्मण आंबेकर हेडक्लर्क

कामे :— सदर समितीने दररोज झालेल्या खेळाची यादी व सांगता समारोहाची माहिती गेम कंट्रोल रूममधुन घेवून मा. पोलीस अधिक्षक सो यांचे परवानगीने प्रेसनोट तयार करून वृत्तपत्रात, न्युज चॅनलला दयावी व वेबसाईटवर माहिती अपडेट करावी.

## परिशिष्ठ क्रमांक - ८

### फोटोग्राफर

:— श्री धनंजय इंगळे पोलीस निरीक्षक बिंनतारी संदेश लोहमार्ग पुणे
:— श्री. वसिम शेख, पोना/४३२, जिविशा, लोहमार्ग पुणे
:— श्री. दिलीप भापकर, पोशि/५९, स्थागुशा, लोहमार्ग पुणे
:— बाहेरील फोटोग्राफर

कामे :— प्रत्येक टिमच्या व्यवस्थापकामार्फत त्यांचे टिमचे फोटोग्राफरसह कामकाज करतील. सदर फोटोग्राफर यांनी दैनंदिन होणारे सर्व खेळाचे फोटो व शुटींग करून दररोज संगणकामध्ये सेव्ह करावे व दररोज सायंकाळी पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यांना रिपोर्ट दयावा.

# परिशिष्ठ क्रमांक - ९

## वैद्यकीय मदत समिती

अध्यक्ष :— डॉ. अनुपमा कांबळे, वैद्यकीय अधिकारी, लोह. पो. मुख्या. दवाखाना खडकी., मोबाईल नं. — ९८२३४७६२४४

सदस्य :— श्रीमती सॅल्व्हिना जयप्रकाश शिंदे, अधिपरिचारिका, मोबाईल नं— ९०२१३४१३५२

:— श्री. योगेश कुकुजी टयुनलाईट, ड्रेसिंग, मोबाईल नं— ८०८०२८७७१९,

:— श्री. भालचंद्र बाळासाहेब गौडीगौडर, कक्षसेवक, मोबाईल नं:— ८६०५३८९३७०

:— श्री. पो.शि/ ........................................................ मुख्यालय खडकी.

कामे :— वैद्यकीय अधिकारी व पुर्ण टिम खेळाचे वेळापत्रकाप्रमाणे आपण मैदानावर हजर राहावे. तसेच १०८ ची एक ऑक्सीजन सिलेंडर असलेली ॲम्बुलन्स मागण्याबाबत पत्रव्यवहार करून दिनांक २०/०९/२०२२ ते दिनांक २३/०९/२०२२ रोजीपर्यंत मागुन घ्यावी. खेळाच्या वेळापत्रकाप्रमाणे आपण मैदानावर हजर राहावे. त्यांना एक गाडी देण्यात येईल. तसेच राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ व २ येथील वैदयकीय व्यवस्था व डॉक्टर यांचेशी संपर्कात राहुन आवश्यकतेप्रमाणे कार्यवाही करतील.

## परिशिष्ठ क्रमांक - १०

### साउंडसिस्टम व विद्युत रोषणाई समिती

:- श्री धनंजय इंगळे पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश लोहमार्ग पुणे
:- श्री. व्ही. एन. झगडे, पोलीस उप-निरीक्षक, बिनतारी संदेश,
:- श्री. प्रमोद ए. पोहरे, पोहवा/ डब्ल्यु. ओ., लोह.पुणे
:- पोशि/२४०, एस.बी. निंभोरे, मुख्यालय खडकी.

कामे :-सदर समितीने मैदानामध्ये पूर्ण रोषणाई करून घ्यावी रात्री असणारे खेळाकरिता मैदानावर लाईट लावून घ्यावी. हे साहित्यातील त्याची मंजुरी घेवून कामाची पूर्तता करावी व साउन्ड सिस्टिम व्यवस्थीत ठेवावी. राज्य राखीव पोलीस बल गटाच्या मैदानावर रात्री सुध्दा खेळता येण्यासाठी प्रकाश व्यवस्था आहे त्याची योग्य पाहणी करुन घेतील

## परिशिष्ठ क्रमांक - ११

### वर्किंग समिती

:- श्री. विजय भोसले, राखीव पोलीस उप- निरीक्षक. मुख्यालय खडकी,
:- सपोफौ बुलाखे
:- सपोफौ पाटील
:- पो.हवा /६२२ भालेराव
:- पोना/५१ नाईकनवरे,
:- मुख्यालयातील नेमून दिलेले कर्मचारी

कामे :- सदर समितीचे अतिशय महत्वाचे काम असुन त्यांनी मैदानामध्ये किल्ला, झेंडे, मैदान मार्किंग तसेच प्रत्येक खेळाच्या मैदानावर मार्किंग करून घ्यावी. तसेच परिसराची साफसफाई रंगरंगोटी करून घ्यावी नेमुन दिलेले सर्व कर्मचारी यांचेकडुन वर्किंग करून घ्यावी.

## परिशिष्ठ क्रमांक - १२

### व्हॉलीबॉल /हॉकी

:-स.पो.फौ. अमोल गवळी व इतर ६ पो.अंमलदार

कामे :- सदर समितीने मैदान मार्किंग तसेच प्रत्येक खेळाच्या मैदानावर मार्किंग करून घ्यावी. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्या ठिकाणी करावी. तसेच बसण्याकरीता कमीत कमी २५ खुर्च्या व्यवस्था करून घ्यावी

## परिशिष्ठ क्रमांक - १३

### बास्केट बॉल/ फुटबॉल

:- पो.उपनिरीक्षक पादोळे व इतर ६ पो.अंमलदार

कामे :- सदर समितीने मैदान मार्किंग तसेच प्रत्येक खेळाच्या मैदानावर मार्किंग करून घ्यावी. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्या ठिकाणी करावी. तसेच बसण्याकरीता कमीत कमी २५ खुर्च्या व्यवस्था करून घ्यावी

## परिशिष्ठ क्रमांक - १४

**हॅन्ड बॉल /खोखो**

:— पो. उपनिरीक्षक वाघमारे व इतर ६ पो.अंमलदार

कामे :— सदर समितीने मैदान मार्किंग तसेच प्रत्येक खेळाच्या मैदानावर मार्किंग करून घ्यावी. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्या ठिकाणी करावी. तसेच बसण्याकरीता कमीत कमी २५ खुर्च्या व्यवस्था करून घ्यावी

## परिशिष्ठ क्रमांक - १५

**कबड्डी**

:— पो.उपनिरीक्षक भिडे व इतर ६ पो.अंमलदार

कामे :— सदर समितीने मैदान मार्किंग तसेच प्रत्येक खेळाच्या मैदानावर मार्किंग करून घ्यावी. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्या ठिकाणी करावी. तसेच बसण्याकरीता कमीत कमी २५ खुर्च्या व्यवस्था करून घ्यावी

## परिशिष्ठ क्रमांक - १६

**ॲथलेटिक्स**

:— स.पो.निरीक्षक कलकुटगे व इतर ७ पो.अंमलदार
:— स.पो.निरीक्षक झोडगे
:— पो.उपनिरीक्षक उबाळे

कामे :— सदर समितीने मैदान मार्किंग तसेच प्रत्येक खेळाच्या मैदानावर मार्किंग करून घ्यावी. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्या ठिकाणी करावी. तसेच बसण्याकरीता कमीत कमी २५ खुर्च्या व्यवस्था करून घ्यावी.

टिप:— राज्य राखीव पोलीस बल गट—१ येथे घेण्यात येणा—या ३६ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०२२ करीता निवड करण्यात आलेले पोलीस निरीक्षक, श्री. प्रमोद खोपीकर, श्री. सुरेशसिंग गौड पो. निरीक्षक, मा.सं.शा./ मसक लोहमार्ग पुणे., व श्री. विजय भोसले यांनी वेळेवर हजर राहुन क्रिडा स्पर्धा पार पाडाव्या व पंच आणि सिनीयर खेळाडु यांचे मदतीनी खेळाडूची निवड करून स्कोअर सिट केलेले कर्मचारी यांचे नावे लिहावी.

# परिशिष्ठ क्रमांक - १७

## ३६ वी लोहमार्ग पोलीस
## परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा पुणे २०२२
## दिनांक २०/०९/२०२२ ते २३/०९/२०२२
## क्रिडा स्पर्धेचा कार्यक्रम

दिनांक १९/०९/२०२२ रोजी दुपारी १४:०० वा राज्य राखीव पोलीस बल गट—१ पुणे येथे तिन्ही जिल्हयाचे संघ रिपार्ट करतील. तसेच क्रिडा आयोजन व खेळाडु निवड समिती सदस्य यांची व तिन्ही जिल्हयाचे संघ व्यवस्थापक यांची मिटिंग दिनांक १९/०९/२०२२ रोजी १७:०० वा. राज्य राखीव पोलीस बल गट—१ पुणे येथे होईल. तसेच ज्युदो, बॉक्सींग, वेटलिफटींग, मॅराथॉन व जलतरण या पुरूष व महिला क्रिडा प्रकारातल्या खेळाडूंचा सहभागाबाबत तिन्ही जिल्हयांच्या संघ व्यवस्थापक व क्रिडा आयोजन खेळाडू निवड समिती यांना मिटींगमध्ये चर्चा करून यातील नमुद क्रिडा प्रकार स्पर्धक नसल्याचे स्पर्धा घेण्यात येवू नये तसेच या क्रिडा प्रकारातील चांगल्या खेळाडुंना पुढे होणा—या ...३२... वी एम.एस.पी.जी करीता परिक्षेत्रीय क्रिडा संघात निवड करण्यात येईल.

### कालावधी दिनांक २०/०९/२०२२ ते दिनांक २३/०९/२०२२

| अ.क्र | क्रिडा प्रकार | स्पर्धेचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | उद्घाटन व समारोप कार्यक्रम | रा.रा.पो.बल गट—१ |
| २ | अॅथलेटिक्स पुरूष/महिला | रा.रा.पो.बल गट—१ |
| ३ | क्रॉस कंट्री पुरूष/महिला | रा.रा.पो.बल गट—१ |
| ४ | हॉकी | रा.रा.पो.बल गट—१ |
| ५ | फुटबॉल | रा.रा.पो.बल गट—१ |
| ६ | बास्केटबॉल पुरूष/महिला | रा.रा.पो.बल गट—१ |
| ७ | व्हॉलीबॉल पुरूष/महिला | रा.रा.पो.बल गट—१ |
| ८ | कबड्डी पुरूष/महिला | रा.रा.पो.बल गट—१ |
| ९ | हॅन्डबॉल | रा.रा.पो.बल गट—१ |
| १० | खो—खो पुरूष/महिला | रा.रा.पो.बल गट—१ |
| ११ | कुस्ती पुरूष/महिला | रा.रा.पो.बल गट—१ |
| १२ | खेळाडूचे निवास्थान | रा.रा.पो.बल गट—१ |
| १३ | परिक्षेत्रीय क्रिडा नियंत्रण कक्ष | रा.रा.पो.बल गट—१ |
| १४ | खेळाडूचे निवड समिती — | रा.रा.पो.बल गट—१ |

## ३६ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०२२, पुणे वेळापत्रक
## वैयक्तीक व सांघीक स्पर्धा पुरूष/महिला सकाळचे सत्र
## दिनांक २०/०९/२०२२, पहिला दिवस

| अक्र | दिनांक | वेळ | क्रिडा प्रकार | कोणाविरूध्द | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०/०९/२०२२ | ०६:३० ते ०९:३० | अॅथलेटिक्स<br>५०००मि. धावणे<br>४०० मि. धावणे<br>लांब उडी<br>गोळा फेक<br>उंच उडी<br>४ X १०० रिले | पुरूष/महिला अंतिम स्पर्धा | रा.रा.पो.बल गट—१ |
| २ | २०/०९/२०२२ | ९:३० | मार्चपास सराव | | रा.रा.पो.बल गट—१ |
| ३ | २०/०९/२०२२ | १०:०० ते १२:०० | फुटबॉल | पुणे विरूध्द नागपुर | रा.रा.पो.बल गट—१ |

## परिशिष्ठ क्रमांक - १८
## ३६ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०२२, पुणे उद्घाटन समारंभ. दि.२०/०९/२०२२

१७:०० प्रमुख पाहुण्यांचे आगमन, प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत कॅप, बॅच, देउन तसेच प्रमख पाहुण्यांना मानवंदना स्विकारण्यासाठी विनंती करतील.
१७:१० प्रमुख पाहुण्यांचे बॅन्डव्दारे मानवंदना.
१७:१५ प्रस्ताविक अपर पोलीस अधीक्षक सो, पुणे लोहमार्ग
१७:२० प्रमुख पाहुण्यांचे भाषण व उद्घाटन झाल्याचे जाहीर करतील.
१६:२५ मशाल धारकाचे ज्योत घेऊन आगमन व क्रिडा ज्योतीचे प्रज्वलन.
१६:३० खेळाडूना शपथ ग्रहण कार्यक्रम संघ नायक करतील.
१६:३५ आभार प्रदर्शन पोलीस उपअधीक्षक,(मुख्यालय) लोहमार्ग पुणे.
१७:४० कबड्डी मॅच पुरूष/महिला मुंबई विरूध्द नागपूर. पुणे विरूध्द नागपूर, पुणे विरूध्द मुंबई

# परिशिष्ठ क्रमांक - १९

## ३६ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०२२, पुणे वेळापत्रक

## वैयक्तीक व सांघीक स्पर्धा पुरूष/महिला सकाळचे सत्र

## दिनांक २१/०९/२०२२, दिवस दुसरा

| अ.क्र | दिनांक | वेळ | क्रिडा प्रकार | कोणाविरूध्द | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१/०९/२०२२ | ०६:३० ते ०९:३० | ॲथलेटिक्स<br>१०००० मी.धावणे<br>२०० मी.धावणे<br>४ X ४०० रिले<br>भाला फेक<br>८०० मी.धावणे | पुरूष/महिला<br>अंतिम स्पर्धा | रा.रा.पो.बल गट—१ |
| २ | २१/०९/२०२२ | ९:३० | मार्चपास सराव | | रा.रा.पो.बल गट—१ |
| ३ | २१/०९/२०२२ | १०:०० | फुटबॉल | मुंबई विरूध्द पुणे | रा.रा.पो.बल गट—१ |
| | | | दुपारचे सत्र | | |
| १ | २१/०९/२०२२ | १५:०० ते १६:०० | हॅन्डबॉल | पुणे विरूध्द नागपुर पुरूष<br>मुंबई विरूध्द पुणे पुरूष<br>मुंबई विरूध्द. नागपुर पुरूष | रा.रा.पो.बल गट—१ |
| २ | २१/०९/२०२२ | १६: ३०ते १८:०० | खो—खो | पुणे विरूध्द नागपुर (पुरूष/महिला)<br>मुंबई विरूध्द पुणे (पुरूष/महिला)<br>मुंबई विरूध्द नागपुर (पुरूष/महिला) | रा.रा.पो.बल गट—१ |

## ३६ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०२२, पुणे वेळापत्रक
## वैयक्तीक व सांघीक स्पर्धा पुरूष/ महिला सकाळचे सत्र
## दिनांक २२/०९/२०२२, दिवस तिसरा

| अ. क्र | दिनांक | वेळ | क्रिडा प्रकार | कोणाविरूध्द | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२/०९/२०२२ | ०६:३० ते ०९:३० | अॅथलेटिक्स<br>१५०० मी.धावणे<br>थाळी फेक<br>तिहेरी उडी<br>११० मी. अडथळा<br>१०० मी. अडथळा<br>४०० मी. अडथळा | पुरूष/महिला अंतिम स्पर्धा | रा.रा.पो.बल गट—१ |
| २ | २२/०९/२०२२ | ९:३० | मार्चपास सराव | | रा.रा.पो.बल गट—१ |
| ३ | २२/०९/२०२२ | १०:०० | फुटबॉल | मुंबई विरूध्द नागपुर | रा.रा.पो.बल गट—१ |
| | | | **दुपारचे सत्र** | | |
| १ | २२/०९/२०२२ | १५:३० ते १८:०० | व्हॉलीबॉल<br><br><br><br><br><br>बास्केटबॉल | मुंबई विरूध्द नागपुर (पुरूष/महिला)<br>नागपूर विरूध्द पुणे (पुरूष/महिला)<br>पुणे विरूध्द मुंबई (पुरूष/महिला)<br><br>मुंबई विरूध्द पुणे (पुरूष/महिला)<br>मुंबई विरूध्द नागपूर (पुरूष/महिला)<br>नागपूर विरूध्द पुणे (पुरूष/महिला) | रा.रा.पो.बल गट—१ |
| २ | २२/०९/२०२२ | १८:०० | कुस्ती | (पुरूष/महिला) अंतिम स्पर्धा | रा.रा.पो.बल गट—१ |

## ३६ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०२२, पुणे वेळापत्रक
## वैयक्तीक व सांघीक स्पर्धा पुरूष/महिला सकाळचे सत्र
## दिनांक २३/०९/२०२२, दिवस चौथा

| अ. क्र | दिनांक | वेळ | क्रिडा प्रकार | कोणाविरूध्द | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २३/०९/२०२२ | ०६:०० | क्रॉस कंट्री | पुरूष/महिला अंतिम स्पर्धा | रा.रा.पो.बल गट—१ |
| २ | २३/०९/२०२२ | ०७:३० | हॉकी | मुंबई विरूध्द पुणे<br>मुंबई विरूध्द नागपूर<br>पुणे विरूध्द नागपूर | रा.रा.पो.बल गट—१ |
| ३ | २३/०९/२०२२ | ०९:३० | मार्चपास सराव | सर्व खेळाडू सहभागी होतील. | रा.रा.पो.बल गट—१ |
| ४ | २३/०९/२०२२ | १०:३० | संघ व्यवस्थापक व निवड समितीची बैठक | | रा.रा.पो.बल गट—१ |

# ३६ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०२२, पुणे

## दिनांक २३/०९/२०२२

## सांगता समारंभ

**सदचे समारोप सोहळयाचा कार्यक्रमाची रूपरेषा मिटिंगमध्ये चर्चा करून वेळ व रूपरेषा ठरविण्यात येईल**

कार्यक्रमाची वेळ :— १६:०० ते १८:४५

१६.०० वा. :— प्रमुख पाहुण्यांचे आगमन.
१६.०२ वा. :— १०० मी धावणे पुरूष व महिला अंतिम स्पर्धा.
१६.२५ वा. :— रस्सी खेच स्पर्धा.(अधिकारी व आमंत्रीत करीता).
१६.३५ वा. :— चहापान व अल्पोहार.
१६.४५ वा. :— प्रमुख पाहुण्यांचे मंचावर आगमन व मानवंदना .
१६.५० वा. :— खेळाडुंचे संचलन (मार्चपास).
१७.१० वा. :— कार्यक्रमाचे प्रस्ताविक व प्रमुख पाहुण्यांना बक्षीस वितरणाची विंनती
१८.०० वा. :— प्रमुख पाहुण्यांचे हस्ते बक्षिस वितरण.
१८.१५ वा. :— प्रमुख पाहुण्यांचे भाषण व स्पर्धा समाप्तीची घोषणा.
१८.२० वा. :— बॅन्डपथक धुन.
१८.२६ वा. :— रिट्रिट.
१८.३० वा. :— परिक्षेत्रीय क्रिडा ध्वज हस्तांतरण.
१८.३५ वा. :— आभार प्रदर्शन.
१८.४० वा. :— सौयोनारा.
१८.४५ वा. :— प्रमुख पाहुण्यांचे प्रस्थान.

## —:खेळाचे प्रकार:—

सदर क्रिडा स्पर्धेमध्ये फुटबॉल, हॉकी, बास्केटबॉल (पुरूष/महिला), व्हॉलीबॉल (पुरूष/महिला), हॅन्डबॉल,(पुरूष) , कबड्ड्डी (पुरूष/महिला), खो—खो (पुरूष/महिला) असे सांघिक खेळ अॅथलेटिक्स (पुरूष/महिला) मैदानी स्पर्धा व कुस्ती असे वैयक्तीक स्पर्धा घेण्यात येणार आहेत. प्रत्येक जिल्हयातील जास्तीत जास्त ११० खेळाडुंना यांना स्पर्धेत सहभाग घेता येईल. सर्व खेळाडुंनी स्पर्धेकरीता लागणारे खेळ साहित्य आपआपले घटकातुन आणणे आवश्यक आहे.

दिनांक ०१/०९/२०२२ रोजी लोहमार्ग परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा मा. पोलीस अधिक्षक, लोहमार्ग पुणे यांचे अध्यक्षतेखाली मिटिंग घेण्यात आली आहे. मिटींग मध्ये लोहमार्ग पुणे, लोहमार्ग मुंबई, लोहमार्ग नागपुर, यांचे टिम मॅनेजर टिम कोच, महिला यांचे जलतरण, बॉक्सींग, या खेळांचा समावेश होणार नाही. लोहमार्ग पुणे, लोहमार्ग नागपुर यांचेकडे खेळाडु नसल्याने खेळाचा समावेश होणार नाही.

## —:स्पर्धेचे नियम:—

१) स्पर्धेमध्ये भाग घेण्याकरीता (३) तीन संघ बनविण्यात आलेले आहेत.
   १) लोहमार्ग पुणे, २) लोहमार्ग मुंबई, ३) लोहमार्ग नागपुर/औरंगाबाद (एकत्रित)

२) सांघिक स्पर्धा मा. पोलीस महासंचालक यांचे कार्यालयातील आदेशान्वये लिंग पध्दतवार घेण्यात येईल.
   १) हॉकी २) फुटबॉल ३) बास्केटबॉल ४) व्हॉलीबॉल ५) कबड्डी ६) खो—खो ७) हॅन्डबॉल

३) सर्व टिम इव्हेंटचे समाने महासंघाचे नियमाप्रमाणे घेण्यात येईल.

४) ॲथलेटिक्स पुरूष/महिला स्पर्धेत एक खेळाडु जास्तीत जास्त दोन (२) इव्हेंट मध्ये भाग घेवू शकते आणि दोन रिले

५) स्पर्धेत पंचाचे निर्णय हे अंतिम निर्णय राहील.

६) खेळाडुना स्पर्धेत भाग घेण्याकरीता वेळापत्रकाचे १५ मि. अगोदर तयार ठेवणे हे संघ नायकाचे जबाबदारी राहील. उशीर झाल्यास दुस—या संघाला विजय घोषित करण्यात येईल.

७) नैसर्गिक व इतर कारणास्तव खेळाचे वेळापत्रकात कधीही फेरबदल होवू शकते व स्पर्धा मागेपुढे घेण्यात येवू शकते. याकरीता सर्व स्पर्धेकांना विशेष सुचना देण्यात येईल. दररोज सकाळी ०६:०० वा ते दुपारी १२:०० पर्यत तसेच दुपारी १४:०० वा ते २०:०० वा. यापर्यंत खेळाडुनी निर्धारीत मैदानावर हजर राहावे. परिस्थीत पाहुन कधीही कोणतेही स्पर्धेची घोषणा करून लगेच ११ मिनीटांनी स्पर्धा सुरू करण्यात येईल.

८) मार्च पास सरावाकरीता दररोज सकाळी ११:०० वा. आपआपली टिम लोहमार्ग रा.रा. पो.बल गट—१ पुणे येथे उभारण्यात आलेले किल्याचे मागे ठेवावी यांची नोंद संघ नायक घेतील.

९) ॲथलेटिक्स इव्हेंटचे गुण पुर्वीच्या राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा परिपत्रकाचे आधारावर खालील प्रमाणे राहील.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ) क्रमांक | I | II | III | IV | V | VI |
| ब) वैयक्तीक स्पर्धेचे गुण | ५ | ३ | २ | १ | ० | ० |
| क) रिले गुण | १० | ६ | ४ | ० | ० | ० |

---

# —: शिस्त :—

पुणे परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेमध्ये भाग घेणा—या प्रत्येक खेळाडुने आपण युनिफॉर्म शिस्तीचा घटक आहोत याची जाणीव ठेवून शिस्तीच्या चाकोरीत राहुन खालील नमुद सुचनांचे काटेकोपणे पालन करावे.

१) स्पर्धेमध्ये भाग घेणारे प्रत्येक खेळाडू हा दाढी कटिंग केलेला व व्यवस्थित खेळाचा गणवेश परिधान केलेला असावा.

२) उद्‌घाटन व समारोप समारंभाचे रंगीत तालीमचे वेळी प्रत्येक विभागाचे खेळाडुनी मार्च पासच्या तालीम करीता दिलेल्या वेळाच्या १५ मिनिट पुर्वी उपस्थित राहावे.

३) उद्‌घाटन व समारोप समरंभाचे वेळेस मार्च पासमध्ये भाग घेणा—या प्रत्येक खेळाडुंनी आपल्या विभागाचे कलर्स शर्ट, पांढरे लोअर्स पीटी शुज, सॉक्स आपल्या विभागाचा झेंडा व नावाची पाटी सोबत घेवून वेळेचे १५ मिनिटापुर्वी हजर राहावे.

४) प्रत्येक खेळाडूंनी वेळापत्रप्रमाणे त्यांच्याशी संबंधित असलेल्या सामने सुरू होण्याचे १५ मिनिटपुर्वी ग्राउंडवर नियमाप्रमाणे न चुकता तयार राहावे. अन्यथा प्रतिस्पर्धी चमुला त्या सामन्याचा विजय घोषित करण्यात येईल.

५) पंचाचा निर्णय हा अंतिम निर्णय असेल.

६) कोणत्याही संघाचा आक्षेप असल्यास सामना संपल्यानंतर ३० मिनीटाच्या आत मैदानावर नियुक्त समन्वय पोलीस अधिका—याकडे लेखी अर्ज सादर करावे.

७) कोणत्याही सामन्याचे वेळी खेळाडूंनी आपसात सौजन्यान वागावे.

८) कोणत्याही खेळाडुंनी मद्यपान (दारू, सिगारेट, बीडी, इत्यादी) सेवन करू नये.

९) स्त्रिया व नागरीकांसोबत चांगली वर्तणूक ठेवावी.

१०) काही कारणास्तव वेळपत्रकाप्रमाणे दिलेल्या वेळात सामने न झाल्यास संयोजन समितीच्या नियमानुसार पुढील वेळी ठरवता येईल.

वरील सर्व नियमांचे काटेकोरपणे व एकनिष्ठेने सर्वांनी पालन करावेत यात हयगय किंवा तक्रार झाल्यास संबंधितावर योग्य कार्यवाही करण्यात येईल. याची कृपया सर्व टिम मॅनेजर, खेळप्रमुख व खेळाडु जातीने लक्ष दयावे.

अतंतः— सर्व संघ नायक व खेळाडुंना विजयासाठी होण्याची शुभेच्छा.

(सदानंद गं. वायसे—पाटील)भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग,पुणे
व
संघटक सचिव, लोहमार्ग पुणे परिक्षेत्रीय पोलीस
क्रिडा स्पर्धा—२०२२

प्रत,

१) मा. पोलीस महासंचालक सो, लोहमार्ग, म.रा. मुंबई
२) मा. पोलीस आयुक्त सो, लोहमार्ग मुंबई.
३) मा. पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर.
४) मा. पोलीस अधीक्षक, लोहमार्ग औरंगाबाद.
५) राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय खडकी,लोहमार्ग पुणे.